# डायरी अधिवेशनाची

वैभव पुराणिक

दिनांक २३ जुलै - शनिवार, मॅकॉर्मिक प्लेस कनव्हेंशन सेंटर, शिकागो

सकाळी ९ वाजता
नाश्त्याला काय? चक्क साबुदाण्याची खिचडी! काय करणार - तीन प्लेट हाणली! दुसरा पर्यायच नव्हता. तहानलेल्या माणसाला अचानक थंड पाण्याने भरलेला हौद सापडावा तसंच होतं हे. पण लवकर आवरायला हवं. फिलाडेल्फियाच्या 'सुंदरा मनामध्ये भरली' फेम मीना नेरुरकरांची निर्मीती असलेलं 'मी आणि माझा गोतावळा' हे नाटक एरी क्राऊन ऑडीटोरीयममध्ये आहे. दिलीप कोल्टकरांचं दिग्दर्शन आणि अतुल परचुरे पुलंच्या मुख्य भूमिकेत! अजून काय हवं एखाद्याला शनिवारी सकाळी?

अकरा वाजता
नाटक छानच झालं! मुख्य म्हणजे आमचा पूर्वी लॉस अँजलिसला असलेला मित्र मंदार गद्रे याची मोठी भूमिका होती. कर्टन कॉलला त्याला अतुल नंतर सगळ्यात जास्त टाळ्या मिळाल्या. अतुल परचुरेविषयी तर सांगायलाच नको! एक रेस्टरुम ब्रेक घ्यायला हवा. एरी क्राऊनमध्ये पुन्हा दिड एक तासाचा भरगच्च कार्यक्रम आहे. सुमारे चाळीस एक पुस्तकांचं सामायिक प्रकाशन आणि मग रत्नाकर मतकऱ्यांचं भाषण.

साडेबारा वाजता
जीवन गौरव पुरस्कार देण्याएवढं कार्य जगन्नाथ वाणी आणि दादा कारखानीसांची. आणि रत्नाकर मतकऱ्यांचं भाषण काय छान झाल! एवढं छान मराठी अलिकडे ऐकलंच नव्हतं. समाज आणि साहित्य यांच्या परस्पर संबंधांच इतक छान विश्लेषण केलं मतकऱ्यांनी! जेवायला उशीर होताय याचं भानच राहिलं नाही. मराठी साहित्यातील अनेक प्रवाह आणि कालानुसार त्याचे समाजावर परिणाम, समाजाचं साहित्यातलं प्रतिबिंब, काय प्रतिंबिंबीत झालं आणि काय नाही! मंदार म्हणाला २५ पानी भाषण आहे. एकदा वाचलं पाहिजे त्याच्याकडून घेऊन.

दुपारी एक वाजता
अरे वा! आज आमरस दिसतोय! आमची एल ए ची मंडळी कुठे बरं बसली आहेत? फोन करुन विचारुया त्यांना. शंकर महादेवनचा कार्यक्रम सुरु व्हायला फक्त एकच तास बाकी आहे.

दुपारी २.४० वाजता
आईशप्पथ - शंकर महादेवनने चक्कं माझे माहेर पंढरी म्हटलं! अर्थातच भीमसेन ते भीमसेनच. आणि त्याचा १८ वर्षाचा बर्कलेत शिकणारा मुलगा एका मराठी चित्रपटाल संगीत देणार आहे म्हणे. भारी आहे

बुवा!  एकीकडे स्वरांगण आणि दुसरीकडे एकांकीका. काय बघायचं बर?

संध्याकाळी पाच वाजता

आमच्या एल ए च्या गायकांना नाही जिंकता आली स्वरांगण स्पर्धा. आता मात्र दमायला झालं आहे. हे कन्वेन्शन सेंटर इतकं मोठं आहे की चालून चालून तुकडे पडतात पायाचे. मी आता हॉटेलवर जाणार आणि चक्क तासभर झोपणार! रात्री मराठी बाणा आहे.

सात वाजता

अरे बापरे पळायला हवं. एल ए ची मंडळी पोचली डायनिंग हॉल मध्ये. मला चांगलीच झोप लागली तासभर. आता एकदम फ्रेश वाटताय. मंडळी मी आलोच सिंहगडावर... (प्रचंड डायनिंग हॉलच्या सिंहगड नामक भागात आमची मंडळी बसली आहेत).

साडे आठ वाजता

एरी क्राऊन थिएटर बऱ्यापैकी भरलंय. चार हजाराला थोडे कमी. मजा येईल इथे मराठी बाणा बघायला. एवढं मोठं स्टेज, अशी साऊंड सिस्टीम मुंबईतच काय पण अख्या शिकागोतही कुठे नसेल.

रात्री बारा वाजता

मेस्मराईझिंग! दुसऱ्यांदा बघूनही मेस्मराईझिंग! बाल्कनीत बसल्याने अनेक नृत्यांची फॉर्मेशन अजूनच छान दिसली. लाईटचा थोडा गोंधळ होता पण जे पहिल्यांदा बघताहेत त्यांना नाही कळणार तो गोंधळ. सेट अगदी मुंबईसारखाच. खास कंटेनर ने मुंबईवरुन अमेरिकेत पाठवलेला. कमाल आहे अशोक हांडेची आणि कन्वेंशन आयोजकांची!

रात्री साडे बारा वाजता

हयाट हॉटेलमधल्या बार मध्ये आम्ही बसलोय. एल ए चे आणि एल ए वरुन अमेरिकेतील इतर शहरात पांगलेले. बार मराठी लोकांनी गच्च भरलाय. कोपऱ्यात एके ठिकाणी श्रेयस तळपदेला लोकांनी घेरलंय. बाजूला 'गोतावळे'कर मीना नेरुरकर शँपेन फोडत आहेत. कुणी अतुल परचुरेबरोबर फोटो कढून घेत आहेत. लोकांचा गलका चालू आहे. लोकं हसत खिदळत मद्याचे घुटके घेत आहेत. तिकडे डेट्रॉईटचे धूमधडाकावाले लोक बसलेआहेत. कुणाचा तरी वाढदिवस साजरा करत आहेत. एकंदरीत सर्व लोकांच्या चेहऱ्यावर एक आनंद झळकतो आहे - आपले आप्तेष्ट भेटल्याचा आणि दर्जेदार कार्यक्रम बघायला मिळाल्याचा. वाईनचे घुटके घेत मीही झोप परतवून लावायचा प्रयत्न करतोय. मला ह्या धुंदीत असंच बसायचंय. हि रात्र कधी संपूच नये असं वाटतंय...